

# कुलगुरु पदासाठी १६९ अर्ज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी जे.एन. यु मुंबई, पुणे विद्यापीठासह देशभरातून १६९ अर्ज प्राप्त झाले आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी पोस्टाने अर्ज करण्याचा शुक्रवारी शेवटचा दिवस होता. १६९ अर्ज प्राप्त झाली असल्याची माहिती सुत्रांनी दिली. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू देवानंद शिंदे यांचा कार्यकाळ १ महिन्यांपूर्वी संपला. त्यानंतर शोध समितीची नियुक्ती करण्यात आली. पुढील पंधरा दिवसात अर्जांची छाननी होऊन त्यानंतर मुलाखतीची प्रक्रिया सुरू होणार आहे.

लोकमत

संडे हटके बातमी

# चर्चेत राहण्यासाठीच अनेक इच्छुकांचे कुलगुरूपदासाठी अर्ज

## शुल्क नाही, तसेच ऑनलाईन प्रक्रियेमुळे वाढती संख्या । शोध समितीचे काम वाढले

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पदाचे आकर्षण, चर्चेत राहणे, अनुभव घेणे, आदी उद्देशाने शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी अनेकांनी अर्ज केले आहेत. शुल्क नाही आणि ऑनलाईन प्रक्रिया असल्याने अर्जांची संख्या वाढली आहे. त्यामुळे कुलगुरु शोध समितीचे काम मात्र वाढले आहे.

गेल्या दहा वर्षांपासून कुलगुरु निवड प्रक्रिया ऑनलाईन झाली आहे. अर्ज करण्याबाबतचे आवाहन करणारी जाहिरात राष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध केली जाते. त्यामुळे अर्ज करणाऱ्यासाठींचे क्षेत्र वाढले आहे. अर्जाला शुल्क नसल्याने आणि जरी, अर्ज पात्र ठरला नाही, तरी काही नुकसान होत नसल्याने इच्छुकांचे प्रमाण वाढत आहे. मागील कुलगुरु निवडीवेळी १२५च्या दरम्यान ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने अर्ज आले होते. यावेळी मात्र, १६९ पर्यंत हा आकडा पोहोचला आहे. विशेष म्हणजे कोरोनाचे वातावरण असतानाही अर्ज वाढले आहेत. मुलाखतीच्या प्रक्रियेसाठी आपण शॉर्टलिस्ट होणार नसल्याची कल्पना असतानाही अनेकजण अर्ज करतात. पण, त्यामुळे समितीचे काम वाढत असून, निवड प्रक्रियेला विलंब होतो. त्यामुळे इच्छुकांनी स्वयंमूल्यमापन करुनच अर्ज करणे आवश्यक आहे.

### अर्ज करण्याची कारणे

- या पदाचे आकर्षण
- नावाची चर्चा व्हावी यासाठी
- प्रक्रियेचा अनुभव मिळविण्यासाठी
- शॉर्टलिस्टमध्ये नाव गेल्यास त्याची माहिती देऊन इतर खासगी शिक्षण संस्थेत चांगल्या वेतनावर पद मिळविणे



“ या पदासाठी अर्ज करणाऱ्यांपैकी १० ते १५ टक्केच उमेदवार मुलाखतीच्या प्रक्रियेपर्यंत पोहोचतात. उर्वरित ८५ टक्के उमेदवारांपैकी काही अतिमहत्त्वाकांक्षी, काही चर्चेत राहण्यासाठी, तर या पदाच्या आकर्षणापोटी अर्ज करतात. त्यामुळे अर्जांची संख्या वाढत आहे. ज्यांच्यामध्ये क्षमता आहे. शिक्षण क्षेत्रातील प्रशासन, वित्त, आदी विविध समित्यांवर काम केल्याचा अनुभव असलेल्या प्राचार्य, प्राध्यापक, संचालकांनी अर्ज करणे आवश्यक आहे.

-डॉ. बी. एम. हिर्डेकर,
शिक्षणतज्ज्ञ



# पीएच.डी., एम.फिल.साठी विद्यापीठाकडून मुदतवाढ

## करोनाकाळात संशोधन कार्य होत नसल्याने निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोना विषाणू संसर्गामुळे संशोधन कार्य होत नसल्याने एम.फिल. आणि पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना सहा महिने मुदतवाढ देण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

करोना संसर्गामुळे विद्यापीठ मार्चपासून विद्यार्थ्यांसाठी बंद असल्याने अनेक विद्यार्थ्यांचे संशोधन रखडले आहे. तसेच काही विद्यार्थ्यांच्या संशोधन कालखंडाची मुदत संपली आहे किंवा लवकरच संपणार आहे. या पार्श्वभूमीवर एम.फिल., पीएच.डी. आणि अन्य संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मुदतवाढ देण्याची मागणी विद्यापीठाच्या अधिसभा सदस्य आणि संशोधक विद्यार्थ्यांकडून करण्यात आली होती. विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार संशोधक विद्यार्थ्यांना सहा महिने वाढवून देण्यात आली आहे. त्या बाबतचे परिपत्रक विद्यापीठाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. नव्या निर्णयानुसार संशोधक विद्यार्थी आणि संशोधन केंद्रांनी कार्यवाही करण्याबाबत विद्यापीठाने सूचित केले आहे.